प्रतिसाद


# ‘बसवंत’ मधमाशी प्रशिक्षण केंद्रात मौलिक कार्यानुभवाचा झाला लाभ

**सुमित नगराळे**
कृषी सहायक,
निमगूळ, ता.जि.धुळे

**नि**मगूळ परिसरातील शेतकऱ्यांसह बसवंत मधुमक्षिका प्रशिक्षण केंद्र, पिंपळगाव (ब.), ता. निफाड, जि. नाशिक येथे नुकतीच भेट दिली. या भेटीमागची पार्श्वभूमी अशी की, आमच्या परिसरात रब्बी हंगामात सूर्यफुलाच्या लागवडीखालील क्षेत्रात वाढ होत आहे. त्यामुळे उत्पन्नात वाढ व्हावी व पूरक उद्योग सुरू व्हावा म्हणून कृषी विभाग, ‘आत्मा’ व महाराष्ट्र खादी ग्रामोद्योग महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आम्ही आमच्या गावात मधुमक्षिका पालनाचे प्रशिक्षण आयोजित केले होते.

या प्रशिक्षणादरम्यान मार्गदर्शन करताना ‘आत्मा’ धुळेचे प्रकल्प- उपसंचालक श्री. राठीसाहेब यांनी पिंपळगाव (ब.) येथे मधमाशी प्रशिक्षण केंद्र असल्याची माहिती दिली. तसेच त्या ठिकाणी अतिशय उत्कृष्ट पद्धतीने मधमाशी पालनाचे व हाताळण्याचे प्रशिक्षण दिले जाते याविषयी माहिती दिली. मधुमक्षिका प्रकल्पाला सुरुवात करण्यापूर्वी शेतकऱ्यांनी तिथे आवर्जून भेट द्यावी, असे राठीसाहेबांनी आम्हाला सूचित केले.

बसवंत मधमाशी पालन प्रशिक्षण केंद्र, पिंपळगाव (ब.) येथे भेट दिली असता तेथे मधमाश्यांचा जीवनक्रम, त्यांच्या विविध प्रजाती, मधमाश्या हाताळणीविषयी प्रत्यक्ष प्रात्यक्षिक तसेच मधाचा औषधी गुणधर्म, मधमाशीपासून मिळणारे विविध उपपदार्थ जसे की- मध, प्रॉपोलिस, पराग कण, मेण,



रॉयल जेली, बी-व्हेनम याविषयी सविस्तर माहिती मिळाली. तसेच ‘ग्रीनझोन ॲग्रोकेम’च्या मुखेड रोड, पिंपळगाव (ब.) येथील ‘बसवंत गार्डन’ या प्रकल्पाला भेट दिली असता तेथे ‘आदर्श गाव- सेवरगाव’ची प्रतिकृती बघण्यास मिळाली. त्यात देखण्या प्रतिकृतींच्या माध्यमातून आदर्श खेडेगावात



कोणकोणत्या सुविधा असाव्यात तसेच गावाचे नियोजन करताना कुठल्या गोष्टींना प्राधान्य द्यावे याविषयी समजले. जल व मृदसंधारण अंतर्गत माथ्यापासून पायथ्यापर्यंत शेतजमिनीवर कोणकोणत्या उपचारपद्धती राबवाव्यात याविषयी माहिती मिळाली. द्राक्षाचे विविध वाण बघण्यास मिळालेत. तसेच मधाचे प्रोसेसिंग व पॅकेजिंग कसे करतात याविषयीही माहिती मिळाली.

या एकदिवसीय प्रशिक्षणाने आमच्यासोबत असलेल्या शेतकऱ्यांच्या मधमाशीविषयक ज्ञानात मोलाची भर पडली. तसेच त्या ज्ञानाचा मधमाशी हाताळणीदरम्यान निश्चितच खूप फायदा होईल, यात शंका नाही.

सर्व शेतकऱ्यांतर्फे बसवंत मधमाशी प्रशिक्षण उद्यान व प्रशिक्षण केंद्राचे खूप खूप आभार! ■